
Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

AN INTERNATIONALMULTIDISCIPLINARY
HALF-YEARLYRESEARCH JOURNAL

# IDEAL



ISSN 2319 - 359X

Volume - VI, Issue - II
March - August - 2018

Ajanta Prakashan

IDEAL - VOL. - VI . ISSUE – II-ISSN 2319-359X (I.F.-4.988) MARCH-AUGUST-2018

# ११. महारारष्ट्रातील शेती व्यवसायात महिलांची भूमिका व कामाचे स्वरूप

**डॉ. बी. आर. गायकवाड**
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभागप्रमुख, अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना.
**डॉ. हिंगे म्हातारबा गोविंद**
सहा. प्राध्यापक, जे.ई.एस. महाविद्यालय, जालना.

**प्रस्तावना :**

इतिहासात महिलांचा कृषी व्यवसायातील सहभाग पूर्वीपासून महत्त्वाचा असून ग्रामीण अर्थव्यवस्थेत महिलांचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. कृषी संस्कृतीत स्त्री कर्तृत्वान होती.. शेतीचा शोध लावला तो एका स्त्रीने आणि आजघडीला बहुतेक ठिकाणी महिलाच शेतीतील सगळी कामे पार पाडत असतात. शेतीचा डोलारा स्त्रियांच्या श्रम शक्तीवर तोललेला आहे. शेतीचा शोध स्त्रियांनी लावला असून प्राचीन काळापासून शेती व्यवसायात काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या अधिक असून त्यात त्या शेतकरी किंवा शेतमजूर म्हणून काम करताना दिसतात. मानवी इतिहासात महिलांचा कृषी व्यवसायातील सहभाग प्राचीन काळापासून महत्त्वाचा असून ग्रामीण अर्थव्यवस्थेत महिलांचे स्थान अतिशय महत्त्वाचे आह शेती व्यवसायातील व घरगुती कामे सुद्धा करतात. शतकानुशतकापासून स्त्रिया ह्या त्यांच्या कुटुंबासाठी विविध प्रकारचे कार्य करत असतात. ग्रामीण भागातील स्त्रिया शेतात तर राबतातच पुन्हा घरच्या कामाची जबाबदारी संपूर्णपणे त्यांचीच असते. तसेच प्राचीन काळापासून महिला घरकामाची जबाबदारी पार पाडून पुरुषांना अन्य महत्त्वाच्या कामात मदत करतात. विशेषतः ग्रामीण भागातील महिलांची भूमिका महत्त्वपूर्ण दिसून येते. कारण घरातील सर्व कामे करुन या महिला शेतीमध्ये पेरणी, कापणी, मळणी इत्यादी कामे करतात. कृषी व्यवसायातील महिला कामगारांपैकी शेतमजूर महिलांचे प्रमाण अधिक होते. कृषी व्यवसायातील कामाचे स्वरुप लक्षात घेता महिलांचा शेती कामात अधिक सहभाग असल्याचे दिसून येते शेत जमिनीच्या मशागतीपासून तर उत्पादन निघेपर्यंतच्या होणाऱ्या सर्वच कामात महिलांचा सहभाग सुर्योदयापासून सुर्यास्तापर्यंत असतो. त्यांच्या सहभागाची खरी सुरुवात घरापासूनच होत असते. घराशेजारी असणारा गोठा साफ करणे, दूध काढणे, जनावरांना चारा घालणे, खूरपणी, लावणी, पेरणी, कटाई, वेचाई यासारखी सर्व कामे महिला करीत असतात. कृषी विपणन क्षेत्र व ग्रामीण लघु उद्योगात देखील महिला मोठ्या प्रमाणात सहभागी असून शारिरीक श्रम करतांना दिसून येतात.. कृषी व्यवसायात महिलांचा सहभागही जमेची बाजू असून कृषी व्यवसाय हा महिलांवर आधारित व्यवसाय आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. ही वास्तविकता स्पष्ट करतांना व कृषी व्यवसायातील महिलांचे योगदान स्पष्ट करतांना एका सर्वेक्षणात आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने देखील याबाबत स्पष्ट केले की, कृषी अन्नधान्य उत्पादनात जवळपास ५० टक्के महिलांचा सहभाग असून कृषी उत्पादन प्रक्रियेत २०० टक्के महिलांचा [illegible]

करणाऱ्या महिलांची सप्रयोजन नमुना निवड पद्धतीने निवड करण्यात येऊन प्राथमिक आधार सामग्रीच्या आधारे "महाराष्ट्रातील शेती व्यवसायात महिलांची भूमिका व कामाचे स्वरूप "या विषयाचे अध्ययन करण्यात आले आहे.

**उद्दिष्ट्ये**

१. महाराष्ट्रातील शेती क्षेत्रातील महिला रोजगार प्रवृत्तीचा अभ्यास करणे.

२. महाराष्ट्रातील शेती क्षेत्रातील महिलांच्या कामाचे स्वरुप व मोबदला यांचा अभ्यास करणे.

**रोजगार स्थिती :**

शेती हा अर्थव्यवस्थेतील रोजगार उपलब्ध करवून देणारा महत्त्वाचा घटक आहे. शेती व्यवसायातील काम हे हंगामी स्वरूपाचे असले तरीही शेतात अनेक प्रकारची कामे असतात. महिला शेतीतअनेक कामे करत असतात. शेतीत वर्षातील काही दिवस काम मिळत असल्याने उत्पन्न कमी मिळते. त्यांना मिळणारी दैनंदिन मजूरी औद्योगिक किंवा अन्य कामगारांच्या तुलनेत कमी असल्याने उत्पन्न कमी राहते. याबाबत किमान वेतन कायदे होऊनही त्यांचे योग्य नियमन न झाल्याने मजूरी दरात खूपच भिन्नता दिसून येते. शेतीत मजूरी करणाऱ्या स्त्रिया आणि मुलांची मजूरी पुरुषांच्या मजूरांपेक्षा कमी असते. या सर्व परिस्थितीचा परिणाम त्यांच्या काम करण्याच्या कार्यक्षमतेवर होतानां दिसून येतो. किमान मजुरीचे कायदे असूनही एका अर्थाने ते केवळ कागदावर आहेत. कारण हंगामामध्ये मजुरांची मागणी जास्त असल्याने त्यांना मजुरी थोडी जास्त मिळते तर हंगाम संपल्यानंतर त्यांचा पुरवठा जास्त असल्याने मिळेल त्या दरावर त्यांना काम करावे लागते. कमी मजुरीच्या दरामुळे आणि कामाच्या कमी दिवसामुळे एकूण उत्पन्न कमी राहते. शेती क्षेत्रात वर्षातील काही काळ व्यक्तींना बरेच काम मिळते, पण इतर वेळी मात्र कामाच्या अभावी त्यांना बेकार रहावे लागते. जेथे कोरडवाहू शेतीचे प्रमाण जास्त असते तेथे वर्षातून फक्त एकच पीक घेतले जाते. वर्षातून कमी दिवस काम मिळते. जिथे सिंचनाच्या सोयी आहेत तेथे वर्षातून दोन ते तीन पिके घेतली जातात. म्हणजेच वर्षभर काम मिळते. पर्जन्य पोषित (कोरडवाहू) शेतीत कामाचे दिवस कमी तर ओलिताच्या सोयी असलेल्या शेतीत कामाचे दिवस जास्त असतात. आज काम मिळाले तरी उद्या काम मिळेल याची शाश्वती नसते. तसेच शेतीत पूर्ण वेळ काम मिळेल याची खात्री नसते. तास-दोन तास काम करून पाऊस आला तर अर्धा रोज देऊन त्यांना घरी पाठविले जाते. त्यामुळे शेतीत मजूरांना उदरनिर्वाह भागविणे कठीण जाते. शेती व्यवसायात कार्य करणाऱ्या महिलांना हंगामी स्वरूपाच्या बेकारीला सामोरे जावे लागत असल्याचे दिसून येते.

शेती व्यवसायातील महिलांच्या रोजगार स्थितीचे अध्ययन करत असताना दैनंदिन शेतात जाणाऱ्या महिला, त्यांना शेतात सरासरी किती तास काम करावे लागते.शेती व्यवसायात कार्य करणाऱ्या नमुना महिलांपैकी सरासरी ६ ते ७ तास काम करावे लागणाऱ्या महिला सर्वाधिक ४४ टक्के आहे. सरासरी १० तासापेक्षा जास्त तास काम करणाऱ्या महिलां २ टक्के म्हणजेच सर्वात कमी असलेल्या दिसून आल्या तसेच सरासरी ८-९ तास काम करत असलेल्या ३६.३३ टक्के होत्या. त्याचप्रमाणे सरासरी ४-५ तास काम करणाऱ्या महिला १७.६७ टक्के असल्याचे दिसून आल्या. म्हणजेच महिलांच्या कामाचे

असतात. शेती व्यवसाय करणाऱ्या नमुना महिलांपैकी ९८.३३ टक्के महिलांचा सहभाग लावणी या कामात दिसून आला. भात लावणीच्या कामात महिला अत्यंत कष्टाचे काम करतात. म्हणजेच लावणीच्या कामात महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात असल्याचा दिसून आला शेती व्यवसायात बागायती पिकांना पाणी देणे हा आंतर मशागतीचा महत्त्वाचा भाग आहे. पिकांच्या महत्त्वपूर्ण वाढींच्या अवस्थेत व आवश्यकतेनुसार पाणी देणे गरजेचे असते. शेती व्यवसाय करणाऱ्या नमुना महिलांपैकी १२.६७ टक्के महिलांचा सहभाग या कामात दिसून आला. रात्रीच्या वेळेस पिकांना पाणी देण्यास महिला सुद्धा पुरूषांच्या बरोबरच जात असल्याचे आढळून आले. शेती व्यवसायात पीक उगवून आल्यानंतर पिकातील तणे ही हाताने उपटून किंवा अवजारांच्या सहाय्याने काढून टाकली जातात. तण नियंत्रणामुळेच तणांची पिकाबरोबर असणारी अन्नद्रव्यांकरिताची स्पर्धा थांबविली जाते. जमीनीची खुरपणी करणे, तण काढणे, घाण वेचून फेकणे, खुरपे किंवा विळा यांच्या सहाय्याने तणांची काढणी केली जाते. शेती व्यवसायात कार्य करणाऱ्या नमुना महिलांपैकी ९७.६७ टक्के महिलांचा सहभाग या कामात असल्याचे दिसून आले.

शेतीतील कामात प्रामुख्याने खत पेरणे पेरणीच्या वेळी पांभरीने खत पेरणे, ऊसासाठी सरीतून खत देणे, उभ्या पिकात खत फेकणे, उभ्या पिकात ओळीत, उराळ सरीत किंवा ठिपका पद्धतीने खत देणे, जमीनीतून खत देणे, भात लावणीच्या वेळी चार आण्यांच्या मधोमध एक युरिया गोळी खोचून छिद्र बंद करणे, फळझाडांसाठी बांगडी पद्धतीने खत देणे, इत्यादी खत देण्याच्या पद्धती असल्याचे दिसून येते. शेती व्यवसाय करणाऱ्या नमुना महिलांपैकी ९६.३३ टक्के महिलांचा खत देण्याच्या वेगवेगळ्या पद्धती मध्ये सहभाग असल्याचे आढळून आले. शेती क्षेत्रात पिकांचे किड व रोगांपासून संरक्षण करण्यासाठी पिकांवर वेगवेगळे किटक नाशके/बुरशी नाशके फवारली जातात. त्याचप्रमाणे तण नाशकांचा वापर करून शेतात बहुवार्षिक तणे उदा. लव्हाळा, हरळी, कुंदा इत्यादींचा जर जास्त प्रादुर्भाव दिसून आला तर त्यासाठी तण नाशकांची फवारणी केली जाते. शेतीत पिकांवर रोग प्रतिकार झाल्यास औषधांची फवारणी करावी लागते. तसेच तण नाशकांची फवारणी करावी लागते. त्यासाठी महिला पाणी देण्याचे कार्य करतात. शेतीव्यवसायात कार्य करणाऱ्या नमुना महिलांपैकी ३९ टक्के महिलांचा सहभाग या कामात दिसून आला. त्यापैकी ५.६७ टक्के महिला स्वतः फवारणी करत तसेच ३३.३३ टक्के महिला फवारणीसाठी पाणी देण्याचे काम करत असल्याचे दिसून आले. म्हणजेच नवीन सकरित पिकांच्या जाती जसे बी. टी. कॉटन, कमी औषधी लागणाऱ्या पिकांच्या जाती यामुळे पिकांवरील कीड व रोगांचे प्रमाण कमी झाल्याने फवारणीचे काम कमी करावे लागते. त्यामुळे या कामातील सहभाग कमी असल्याचे दिसून आले.पीक उगवून आल्यापासून ते निघेपर्यंत बरीच कामे करावी लागतात. पिकांची काळजी घेणे, विरळणी करणे, नांग्या भरणे, तण नियंत्रण, अच्छादनाचा वापर, भर देणे, खतांची मात्रा देणे, पाणी व्यवस्थापन यासारखी कामे करावी लागतात. या कामात शेती व्यवसाय करणाऱ्या नमुना महिलांपैकी ८६.३३ टक्के महिलांचा सहभाग दिसून आलापीक संवर्धन व संरक्षणाच्या कामातील सहभागाचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून आले.शेती व्यवसायातील काही पिकांचे वाढीच्या अवस्थेत अथवा पक्वतेच्या वेळी पक्षी व इतर जनावरांपासून राखण करावे लागते. शेती व्यवसाय करणाऱ्या नमुना महिलांपैकी ९१.८३ टक्के महिलांचा सहभाग यात दिसून आला. म्हणजेच महिलांचा सहभाग या कामात अधिक असल्याचे दिसून आले.शेतीत पीक परिपक्व झाल्यानंतर त्याची कापणी करावी लागते. म्हणजेच काढून घ्यावे लागते. नंतर मळणी यंत्राच्या

जास्त मजुरी मिळत असल्याचे दिसून आले. याचाच अर्थ शेतीत काम करणाऱ्या महिलांना मिळणारा कामाचा मोबदला अल्प असल्याचे दिसून येते शेती व्यवसायात कार्य करणाऱ्या नमुना निवडीतील महिलांच्या एकूण वार्षिक मजूरी मोबदल्याचे अध्ययन केले असता शेतीत काम केल्यानंतर महिलांना नमुना पाहणीत १०००१ ते १५००० रूपयें वार्षिक एकूण मजूरी सर्वाधिक ३९.८३ टक्के महिलांची होती. तर २५००१ ते ३०००० रूपये एकूण वार्षिक मजूरी असणाऱ्या महिलांचे प्रमाण सर्वात कमी २.१७ टक्के इतके होते. त्याचप्रमाणे १५००१-२०००० रूपये वार्षिक एकूण मजूरी असणाऱ्या महिलांचे प्रमाण २३.८३ टक्के इतके असल्याचे दिसून आले. ५०००-१०००० रू. एकूण वार्षिक मजूरी असणाऱ्या महिलांचे प्रमाण १७.५ टक्के इतके होते. २०००१-२५००० रू. एकूण वार्षिक मजूरी असणाऱ्या १६.६७ टक्के महिलांची असल्याचे दिसून आले. म्हणजेच महिलांना प्रतिदिवस मिळणाऱ्या मजूरीचे प्रमाण कमी अधिक असल्याने त्यांच्या वार्षिक एकूण मजूरीमध्ये तफावत आढळून येते. महिलांना कामाच्या तुलनेत मिळणारी प्रतिदिवस मजूरी कमी असल्याने वार्षिक एकूण मजूरीची रक्कम कमी होताना दिसून आली.

शेती मशागत, पेरणीपूर्व मशागत, पेरणी, लावणी, खुरपणी काढणी व मळणी, कापणी, पीकसंवर्धन व संरक्षण या सारखी कामे महिलानां करावी लागतात. घरातील सर्व कामे करुन महिला शेतीत काम करताना दिसून येतात. त्याचप्रमाणे शेतीत बैलगाडी जुंपून नेण. पेरणी सारखी कामे महिलाच करत असल्याचे दिसून आले.शेती व्यवसायात महिला सरासरी ८ ते १० तास काम करावे लागते. हंगामात महिलांना शेतीत काम मिळते परंतू हंगामानंतर त्यांना इतर कामाचा शोध घ्यावा लागतो. तसेच हंगामात महिलांना अधिक कामे मिळतात. परंतू हंगामानंतरच्या काळात मजूरीवर काम करावे लागते. तसेच महिलांना कामाच्या प्रमाणात मजूरी व मोबदला मिळत नसल्याने त्यांच्या कुंटूबाचे अर्थकारण बिघडल्याचे दिसून येते.हंगामी स्वरुपाच्या कामामूळे कमी दिवस मजूरी व एकुण वार्षिक मजूरी उत्पन्न कमीच मिळते. त्यामूळेच महिलाच्या मजूरीत वाढ करण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भ**

१. डॉ. बी. डी. इंगळे : महाराष्ट्राची अर्थव्यवस्था अरुणा प्रकाशन, लातूर.
२. डॉ. माधवराव बिराजदार : महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद.
३. प्रा.प्रकाश घोबडे : भारतीय समाजरचना : पारंपरिक व आधुनिक, विद्या प्रकाशन, नागपूर, १९८४.
४. जोशी माधुरी अनिल : बदलते सामाजिक प्रेक्ष्य मे नारी व्यथा, साहित्य संस्थान, गाझीयाबाद.
५. डॉ. वसुधा पुरोहित : कृषी अर्थशास्त्र, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.
६. चि. ग. घांगरेकर आणि श्रुती उदय मेहता : राजकीय समाजशास्त्र, दत्त सन्स, जवाहरलाल नेहरू मार्ग सदर, नागपूर.
७. सुधा काळदाते : भारतीय सामाजिक समस्या, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.